सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ
गणेशखिंड, पुणे – ४११ ००७.

डॉ. सवित्ता कुलकर्णी
संचालक (अतिरिक्त कार्यभार)

संदर्भ : विविमं/२०२६–२७/३९० **अत्यंत महत्त्वाचे व कालमर्यादेचे** दिनांक : १२/१०/२०२६

प्रति,
मा. प्राचार्य/ मा. संचालक/ मा. विभागप्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील सर्व पदवी व पदव्युत्तर विभाग.

**विषय : विद्यार्थी परिषद निवडणुकांसंदर्भात गठित तज्ज्ञ समितीस अभिप्राय सादर करण्याबाबत.**

संदर्भ : मा. कुलसचिव मुंबई विद्यापीठ तथा सदस्य सचिव विद्यार्थी परिषद निवडणुका समिती महाराष्ट्र राज्य यांचे आईजी/२०१६/७१०५५, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१६ चे पत्र.

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदींनुसार विद्यार्थी परिषद निवडणुकांसंदर्भात अभ्यास व सल्लामसलत करण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीने या विषयासंदर्भातील कामकाज सुरू केले आहे.

विद्यार्थी परिषद निवडणुका निकोप, मुक्त व निर्भय, शांततापूर्ण तसेच पारदर्शक वातावरणात पार पडण्यासाठी तसेच महाविद्यालये व विद्यापीठ यांच्या भागधारकांची (Stakeholder) मते जाणून घेण्याचा या समितीचा मानस आहे. त्या अनुषंगाने, संदर्भीय पत्रान्वये समितीने शैक्षणिक संस्थांचे प्रमुख, व्यवस्थापन प्रतिनिधी, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, पालक तसेच विद्यार्थी यांचे अभिप्राय संकलित करणेबाबत कळविले आहे.

यास्तव आपल्या संस्थांचे प्रमुख, व्यवस्थापन प्रतिनिधी तसेच मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख आपणांसह आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागांमधील मा. विभागप्रमुख, मा. प्राध्यापक, मा. प्रशासकीय अधिकारी/शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी आणि विद्यार्थ्यांच्या माध्यमातून त्यांचे पालक अशा संबंधित सर्व घटकांपर्यंत सदर विद्यार्थी परिषद निवडणुकांसंदर्भात अभिप्राय नोंदविण्याची माहिती पोहोचवून, त्यांना सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने उपलब्ध करून देण्यात आलेल्या Google Form मध्ये त्यांचे अभिप्राय, सूचना व मते नोंदविण्याबाबत सूचित करावे.

सदर पत्र आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/विभागातील मुख्य सूचना फलकावर तसेच विद्यार्थी एकत्र येत असतात (उदा. ग्रंथालय/वाचनकक्ष/वर्गखोल्या/विश्रांतीगृह/उपहारगृह/वसतिगृह) अशा दर्शनीय भागात प्रदर्शित करून सदर बाब सर्व विद्यार्थी व उपरोक्त इतर सर्व घटकांच्या निदर्शनास आणून विद्यार्थी परिषद निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील नमूद मुद्यांच्या अनुषंगाने अभिप्राय Google Form मध्ये नोंदविण्यासाठी संबंधितास सूचित करावे. कळावे, ही विनंती.

**तरी, विद्यार्थी परिषद निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील आपल्या सर्वांची मते समितीपर्यंत पोहोचण्यासाठी या बाबीस प्राधान्य देऊन उपरोक्त संबंधित सर्व घटकांचा सक्रिय सहभाग सुनिश्चित करावा व निर्धारित मुदतीत Google Form द्वारे विद्यार्थी परिषद निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील अभिप्राय नोंदविण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याबाबत संबंधितांना सूचित करावे, कळावे, ही विनंती.**

| | | |
|---|---|---|
| विद्यार्थी परिषद निवडणूक अभिप्राय नोंदविण्याची मुदत | : | **सोमवार, दिनांक २६ ऑक्टोबर २०२६ पर्यंत** |
| Google Form लिंक | : | **https://forms.gle/WVLrembFFWikqjaq8** |

**विद्यार्थी विकास मंडळ कार्यालय**
**संपर्क क्रमांक : ०२०–२५६२२६८०/८१**

**(प्रा. डॉ. सविता कुलकर्णी)**
संचालक (अतिरिक्त कार्यभार), विद्यार्थी विकास मंडळ



# मुंबई विद्यापीठ

नॅक : अे++ श्रेणी
(CGPA 3.65)

डॉ. प्रसाद कारंडे
कुलसचिव

क्र. आईजी/२०२६/७१०५५

६ ऑक्टोबर, २०२६
१४ अश्विन, शकसंवत १९४८

प्रति,
कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

संदर्भ : शासन निर्णय क्रमांक – संकीर्ण २०२६/ई-१७६००८७/वि.शि.५ दिनांक २४ सप्टेंबर, २०२६

महोदय/महोदया,

उपरोक्त शासन निर्णयानुसार महाराष्ट्र सार्वजनिक अधिनियम, २०१६ च्या तरतुदीनुसार विद्यार्थी परिषद निवडणूकासंदर्भात अभ्यास व सल्लामसलत करण्यासाठी महाराष्ट्र शासनामार्फत मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरू प्राचार्य सुहास पेडणेकर यांच्या अध्यक्षतेखाली तज्ज्ञ समितीचे गठन करण्यात आले आहे. समितीने यासंदर्भात आपले कामकाज सुरु केले आहे.

विद्यार्थी परिषद निवडणुका निकोप, मुक्त व निर्भय, शांततापूर्ण, पारदर्शक वातावरणात पार पडण्यासाठी तसेच महाविद्यालये, विद्यापीठे यांच्या भागधारक (Stakeholder) यांची मते जाणून घेण्याचा समितीचा मानस आहे.

आपणास विनंती आहे की, आपल्या विद्यापीठातील मा. कुलगुरू, मा.प्र.कुलगुरू, मा. कुलसचिव, संचालक, विविध प्राधिकरणांचे प्रतिनिधी, तसेच शैक्षणिक संस्थांचे प्रमुख, व्यवस्थापन प्रतिनिधी, प्राचार्य, विभाग प्रमुख, प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, पालक तसेच विद्यार्थी यांचे सोबत जोडलेल्या प्रपत्रात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने अभिप्राय संकलित करून त्याची संकलित PDF प्रत registrar@fort.mu.ac.in या e-mail वर पाठवावी.

धन्यवाद.

आपला

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव, मुंबई विद्यापीठ तथा सदस्य सचिव
विद्यार्थी परिषद निवडणुका समिती, महाराष्ट्र राज्य

# महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत विद्यार्थी परिषद निवडणूक प्रश्नावली

विद्यापीठ / संस्था : ____________________

पत्ता : ____________________

पद : ____________________

१. विद्यार्थी परिषद निवडणुका पूर्णतः निकोप वातावरणात पार पडण्यासाठी आपल्या सूचना.

1. Your suggestions for the student council elections to be held in a completely peaceful environment

२. विद्यार्थी परिषद निवडणुकीची प्रक्रिया सुलभ, गतिमान करण्यासाठी डिजिटल किंवा ऑनलाईन करण्याबाबतच्या आपल्या सूचना.

2. Your suggestions regarding digitizing or moving the student council election process online to make it streamlined and efficient.

३. विद्यार्थी परिषद निवडणुकांमध्ये राजकीय हस्तक्षेप टाळण्यासंदार्भातील आपल्या सूचना.

3. Your suggestions regarding avoiding political interference in student council elections.

४. विद्यार्थी परिषदेवर नामनिर्देशन करण्याबाबत आपल्या सूचना.

4. Your suggestions regarding nominations to the Student Council.

५. विद्यार्थी परिषद निवडणूक प्रक्रियेत शासन, प्रशासन व प्रशासकीय सहभाग कसा असावा या विषयीच्या आपल्या सूचना.

5. Your suggestions regarding the nature of the involvement of the government, administration, and administrative staff in the student council election process.

६. विद्यार्थी विकासासाठी विद्यार्थी परिषदेचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीकोनातून विद्यार्थी परिषद कर्तव्ये व जबाबदाऱ्या काय असाव्यात या बाबत आपले मत.

6. Your views on what the duties and responsibilities of the Student Council should be, with the aim of enhancing its participation in student development.

७. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अनुषंगाने विद्यार्थी परिषद सहभाग कोणत्या पद्धतीने अधिक प्रभावी करता येईल या बाबत आपले मत.

7. Your views on how student council participation can be made more effective in alignment with the National Education Policy 2020.

८. विद्यार्थी परिषद निवडणूक नियमांचे उल्लंघन होऊ नये याकरिताचा उपाययोजना.

8. In order to comply with the rules of student council election the below mentioned precautionary measures are as follow.